दाखल तारीख – ११.१२.२०२४
नोंदणी तारीख – ११.१२.२०२४
निकाल तारीख – ०३.०८.२०२६
कालावधी – वर्षे : महिने : दिवस
०१ : ०७ : २३

| |
|---|
| **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कुडाळ यांचे न्यायालयात**<br>**ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग** |
| (पिठासीन अधिकारी – जी.ए.कुलकर्णी)<br>(अधिघोषित दिनांक ०३.०८.२०२६)<br>**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.३८६/२०२४**<br>**निशाणी क्र.७ लगत** |
| प्रथम खबर अहवाल क्रमांक–२८३/२०२४<br>कुडाळ पोलीस स्टेशन |

| | |
|---|---|
| अभियोगपक्ष | **महाराष्ट्र शासन तर्फे**<br>पोलीस ठाणे अंमलदार<br>कुडाळ पोलीस स्टेशन |
| अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ | श्रीम.ए.डी.मिरजे |
| | **विरुध्द** |
| आरोपी | शिवाजी सुरेश घाडी<br>वय–३५ वर्षे, धंदा–मोलमजुरी<br>रा.हळदीचे नेरूर तिवरवाडी<br>ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | श्रीम.एन.एस.रांगणेकर–सावंत |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | १३.११.२०२४ |
| गुन्हा दाखल दिनांक | १३.११.२०२४ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | ११.१२.२०२४ |

| | |
|---|---|
| दोषारोप तयार केल्याचा दिनांक | १९.११.२०२५ |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | २२.०६.२०२६ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक | ०३.०८.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | ०३.०८.२०२६ |
| दोषी ठरल्याचा दिनांक, जर असल्यास | निरंक |

**आरोपीची माहिती**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर मुक्त केल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | आरोपीस सुनाविण्यात आलेली शिक्षा | बंदीवान म्हणून असलेला कालावधी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४६८ करिता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शिवाजी सुरेश घाडी | बी.एन.एस.एस. ३५ (३) प्रमाणे नोटीस | १५.०२.२०२५ | महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (ई) प्रमाणे | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

**–:: न्यायनिर्णय ::–**

**(दिनांक ०३.०८.२०२६ रोजी घोषीत)**

साक्षीदारांचे जाब जबाब आणि प्रकरणाचा अभिलेख पहाता, सदर प्रकरणात खालील मुद्दे निघतात. सदर मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| **१.** | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे का की, दि.१३.११.२०२४ रोजी १७.४५ वाजणेचे सुमारास गाव | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| | मौजे हळदीचे नेरूर, तिवरवाडी ता.कुडाळ येथे आरोपी एका पिवळसर रंगाच्या कापडी पिवशीमध्ये गोवा बनावटी दारूच्या गोल्डन ए.सी.ई.ब्ल्यू व्हिस्की असे लेबल असलेल्या दारूने भरलेल्या १८० मिली मापाच्या एकुण ४१ सिलबंद प्लॅस्टीक बाटल्या अशी बेकायदेशीर दारु विक्री करणेच्या उद्देशाने विनापरवाना कब्जात बाळगलेल्या स्थितीत आढळून आला ? | |
| २. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

**–:: कारणमिमांसा ::–**

२. याकामी अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचे दोषारोप शाबीत करणेकरिता खालीलप्रमाणे एक साक्षीदार तपासला.

**अ) अभियोगपक्षाचे साक्षीदार :–**

| **अनु.क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| १. | तुकाराम महादेव सावंत | पंच साक्षीदार |

**ब) बचाव पक्षाचे साक्षीदार असल्यास :–**

| **अनु.क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क) न्यायालयीन साक्षीदार, असल्यास :–**

| **अनु.क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**अभियोगपक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन निशाणीची यादी**

**अ) अभियोग पक्ष :–**

| **अनु.क्र.** | **निशाणी नंबर** | **निशाणी नंबरचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ब) बचाव पक्ष :–**

| **अनु.क्र.** | **निशाणी नंबर** | **निशाणी नंबरचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क ) न्यायालयीन निशाणी :–**

| **अनु.क्र.** | **निशाणी नंबर** | **निशाणी नंबरचे स्वरुप** |
|---|---|---|
| १ | निशाणी क्र. ८ | रासायनिक पृथक्करण अहवाल |

**ड) मुद्देमाल तपशील :–**

| **अनु.क्र.** | **मुद्देमाल क्रमांक** | **मुद्देमालाचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

३. आरोपीने त्याचे बचावासाठी स्वतःची अगर कोणत्याही साक्षीदाराची साक्ष नोंदवलेली नाही अगर कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. आरोपी विरुध्द पुरावा समोर न आलेने आरोपीचा भारतीय नागरी सुरक्षा संहिता कलम ३५१ (१) (ब) प्रमाणे जबाब नोंदविणेत आलेला नाही.

४. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

**<u>मुद्दा क्रमांक १ करिताः–</u>**

५. अभियोगपक्ष साक्षीदार क्र.१ हे जप्ती पंचनामेवरील पंच साक्षीदार असून, त्यांनी त्यांचे सरतपासामध्ये ' दि.१३.११.२०२४ रोजी ते कोठेही गेले नव्हते. त्यादिवशी त्यांचेसमक्ष काही घडले नाही. त्यांना पंचनाम्याकरीता पोलिसांनी बोलाविले नव्हते. त्यांचेसमक्ष कोणताही पंचनामा तसेच काही जप्त करणेत आलेले नाही. त्यांनी केवळ एका कागदावर सही केलेली होती. जप्ती पंचनाम्यावर अनु.क्र.१ वर त्यांची सही आहे. परंतु त्यातील मजकुराबाबत त्यांना काही माहिती नाही.

असा मजकूर कथन केलेला आहे. सरकारी अभियोक्ता यांनी प्रस्तुत साक्षीदारास उलटतपास स्वरुपातील प्रश्न विचारुन जप्ती पंचनामा सिध्द करणेचा पुरेपुर प्रयत्न केला. तथापि, प्रस्तुत साक्षीदाराने जप्ती पंचनामा सिध्द होईल या आशयाची कोणतीही बाब या न्यायालयासमक्ष कथन अथवा मान्य केलेली नाही.

६. अभियोग पक्षास वेळोवेळी संधी देवुन देखील अभियोग पक्षाने फिर्यादी, तपासी अधिकारी तसेच अन्य साक्षीदार यांना तपासलेले नाही. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द दाखल केलेली फिर्याद सिध्द केलेली नाही. तसेच, तथाकथित जप्त मुद्देमाल या न्यायालयासमक्ष सादर करणेत आलेला नाही. अशा परिस्थितीमध्ये केवळ आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल करणेत आले म्हणुन अभियोग पक्षाने गुन्हा शाबीत केला असे म्हणता येणार नाही. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (ई) प्रमाणे आरोपीने गुन्हा केलेचे निष्पन्न होणेकरीता अभियोग पक्षाने घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिध्द करणे अत्यंत जरुरीचे आहे. तथापि, प्रस्तुतकामी अभियोग पक्षाने घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिध्द करणेकरीता कोणतेही प्रयत्न केलेचे दिसून येत नाही.

७. प्रस्तुतकामी निशाणी क्र.८ रासायनिक पृथक्करण अहवाल सादर करणेत आलेला असून, त्याचे अवलोकन केले असता, रासायनिक पृथक्करण केलेल्या द्रव्यामध्ये अनुक्रमे ३२.५०% v/v इतके इथाईल अल्कोहल असलेचे स्पष्ट होते. तथापि, अभियोग पक्षाने रासायनिक पृथक्करणाकरिता पाठविणेत आलेले द्रव्य हे आरोपीचे ताब्यातून जप्त करणेत आलेले होते ही बाब निःसंशयपणे सिध्द करणेस अभियोगपक्ष अपयशी ठरलेला आहे. मुलतः अभियोग पक्षाने जप्ती पंचनामा निःसंशयपणे सिध्द केलेला नसलेमुळे या कामी दाखल झालेला रासायनिक पृथक्करण अहवाल आरोपीचे दोषत्व सिध्द करणेस पुरेसा व माफक पुरावा होणार नाही.

एकंदरीत अभिलेखावरील सर्व पुरावा विचारात घेता, अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द ठेवणेत आलेले आरोप हे निःसंशयपणे सिध्द केलेले दिसून येत नाही. सबब मी मुद्दा क्रमांक १ चा निष्कर्ष *'नकारार्थी'* नोंदवित आहे.

**मुद्दा क्रमांक २ करीताः–**

८. मुद्दा क्रमांक २ चे निष्कर्षा करिता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

**१.** आरोपी शिवाजी सुरेश घाडी वय–३५ वर्षे, रा.हळदीचे नेरूर, तिवरवाडी ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग यांची भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७८(१) नुसार महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) खाली शिक्षापात्र असलेल्या आरोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

**२.** आरोपीचा वैयक्तिक जातमुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

**३.** आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २०२३ मधील कलम ४८१ च्या पुर्ततेसाठी रक्कम रु.१५,०००/– रुपयांचे बंधपत्र व जामीनदारांचे जामीनखत सात दिवसांचे आत सादर करावे.

**४.** पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन कुडाळ यांना निर्देशित करणेत येते की, याकामी जप्त असलेला मुद्देमाल म्हणजेच एक पिवळसर रंगाची कापडी पिशवीत गोल्डन ए.सी.ई ब्ल्यू व्हिस्की असे लेबल असलेल्या १८० मिली मापाच्या गोवा बनावटीच्या दारूने भरलेल्या प्लॅस्टीकच्या कंपनी सिलबंद एकुण ४१ बाटल्या या मुद्देमालाची नियमाप्रमाणे विल्हेवाट लावणेकरिता निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क कार्यालय सिंधुदुर्ग–ओरोस यांचेकडे अपील कालावधीनंतर पाठविणेत यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)

सही/–

दिनांक–०३.०८.२०२६.

[ जी.ए.कुलकर्णी ]
न्यायदंडाधिकारी वर्ग–१ कुडाळ.

**प्रमाणपत्र**

मी हमी देतो की, सदरच्या पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर हा मुळ न्यायनिर्णयातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | ललितकुमार धों. सावंत |
| न्यायालय | न्यायदंडाधिकारी वर्ग–१, कुडाळ |
| न्यायनिर्णय घोषीत दिनांक | ०३.०८.२०२६ |
| न्यायीक अधिकारी यांनी सही केलेले दिनांक | ०३.०८.२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केलेले दिनांक | ०३.०८.२०२६. |